**<u>शपथेवर पुढील सरतपास ॲड. एस. एम. राठी अर्जदारा तर्फे</u> :—**

**१२.** शपथपत्र **<u>नि.क्र. यु—६</u>** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. नि. यु—२ अनु क्रमांक ०१ वर पगार पत्रकाची प्रमाणीत प्रत सादर केलेली आहे त्यास **नि. यु—११** देण्यात आले. नि. यु—२ अनु क्रमांक ०२ वर वरील नोटीसीची स्थळ प्रत दाखवीली. त्यावर माझे वकीलाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. यु—१२** देण्यात आले. कागदपत्र यादी नि. यु—२ सोबत अनु. क्र. ०३ वर तीन पोष्टाच्या पावत्या व अनु क्र. ४ वर ट्रॅक कन्साईनमेंट अनु क्र ५ वर पोष्टाचे पाहोच पावती अनु ६ वर ट्रॅक कन्साईनमेंट पावत्या सादर केलेल्या आहेत. त्यास **नि. यु—१३ ते यु—१८** देण्यात आले.

कागदपत्र यादी नि. यु—१० सोबत अनु. क्रमांक ०१ माझे सेवा पुस्तकाची प्रमाणतीत प्रत दाखल केलेली आहे. त्यास **नि. यु—१९** देण्यात आले.

सरतपास पूर्ण झाला.

**प्रतिवादी क्रमांक १ ते ३ चे अधिवक्ता यांचे तोंडी विनंती वरुन प्रकरण उलट तपासाकरीता पुढील तारखे पर्यन्त तहकूब करण्यात आले. :**

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ०७.०२.२०२६.